

डॉ. सतीश कामत



डॉ. राज ताडेराव



अब्राहमबापू आवळे



डॉ. कपिल राजहंस

भारतीय साहित्यात अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याला अनन्यसाधारण अशाप्रकारचे महत्त्वाचे स्थान आहे. अण्णा भाऊ साठे यांनी इ. स. १९४१-४२ पासून साहित्य लेखनास प्रारंभ केला. या प्रवासात त्यांनी जवळपास नव्वद पुस्तके लिहिली, त्यात १४ लोकनाट्य, १५ पोवाडे, १३ गीत पुस्तिका, १ नाटक, १ प्रवास वर्णन, १३ कथासंग्रह, ७ चित्रपट कथा आणि ३२ कादंबऱ्या एवढी प्रचंड प्रमाणात साहित्य निर्मिती केली. त्यांच्या साहित्यकृतीच्या एकापासून सतरा पर्यंत आवृत्त्या निघाल्या. अनेक पारितोषिके मिळाली. त्यांच्या लेखनावर अनेक चित्रपट निघाले. त्यांची पुस्तके विद्यापीठात अभ्यास करण्यासाठी निवडली जात आहेत. त्यांचे साहित्य पीएचडीच्या संशोधनाचा विषय ठरत आहे. भारतातील व जगातील २७ भाषांमध्ये त्यांचे साहित्य भाषांतरित झालेले आहे. आजही वाचनालयात अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याला अग्रक्रमाने मागणी असते.

साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या साहित्य व कार्यावर आज मोठ्या प्रमाणात विचारमंथन होत आहे. त्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणून अण्णा भाऊ साठे यांच्या अनेक पैलूंना ग्रंथात मांडण्याच्या आणि सर्वव्यापी दस्तऐवज वाचकांना उपलब्ध करून देण्याच्या हेतूने साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे हा ग्रंथ संपादित करीत आहोत.

रु. १२००/-

ISBN : 978-93-87322-93-6

निर्मिती प्रकाशन
८७३, क/२, सी वॉर्ड, सिध्दीश्री प्लाझा,
राजाराम रोड, कोल्हापूर – ४१६००२
मो. ९८९०५५४३४०, ९८२२४७२१०९

NIRMITI PRAKASHAN

# साहित्य सम्राट अण्णा भाऊ

संपादक – डॉ. राज ताडेराव / डॉ. सतीश कामत / अब्राहमबापू आवळे / डॉ. कपिल राजहंस

निर्मिती प्रकाशन

साहित्य सम्राट
अण्णा भाऊ

संपादक
डॉ. राज ताडेराव / डॉ. सतीश कामत
अब्राहमबापू आवळे / डॉ. कपिल राजहंस



2021-22
Arts, Science & Co... Dist.

६७. **अण्णा भाऊंच्या कादंबरीतील आवडी: एक बंडखोर नायिका**
आरती केशवराव गायकवाड / ४९२
६८. **क्रांतिकारी लेखक अण्णा भाऊ साठे**
प्रा. सत्येंद्र राऊत / ४९९
६९. **अण्णा भाऊ साठे व त्यांच्या साहित्यातील स्त्री दर्शन**
डॉ. प्रगती दिनेश नरखेडकर / ५०३
७०. **अण्णा भाऊ साठे यांचे साहित्यिक अवलोकन**
प्रा. एल. एच. पंडुरे / ५०७
७१. **अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील स्त्री**
प्रा. डॉ. मयुर सदानंद शारब्रिद्रे / ५१२
७२. **अण्णा भाऊंच्या शाहिरीतील विद्रोह**
डॉ. चांदोजी सोपान गायकवाड / ५१६
७३. **अण्णा भाऊ साठे – एक थोर साहित्यिक**
डॉ. बाबासाहेब विठोबा माळी / ५२९
७४. **अण्णा भाऊ साठे एक महान साहित्यरत्न**
प्रा. कैलास सत्यवान शेलार / ५३३
७५. **अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील विविध पैलू**
श्री कुंडलिक रामचंद्र भिंगारदेवे / ५४२
७६. **कामगार रंगभूमीवरील अण्णा भाऊ साठे यांचे योगदान**
प्रा. राजश्री कदम / ५४५
७७. **अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील मार्क्सवादी प्रेरणा**
प्रा.दिलीप यशवंत बर्वे / ५५१
७८. **सत्यशोधक अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील क्रांतिकारी, साम्यवादी, आर्थिक दृष्टीकोन**
डॉ. देवराव सुखदेवराव मनवर / ५६२
७९. **अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्री**
प्रा. विजया नितीन रणदिवे / ५७३
८०. **अण्णा भाऊ साठेंचे कथात्मक साहित्य**
प्रा. जगदीश पांडुरंग राणे / ५७६



८१. **साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवादी प्रेरणा**
डॉ. देविदास विक्रम हारगिले / ५८२
८२. **अण्णा भाऊ साठे यांचे 'स्त्री' विषयक विचार**
सौ. स्नेहलता जगदीश राणे / ५८६
८३. **अण्णा भाऊंच्या कथा : मनोरंजनात्मक कि प्रबोधनात्मक एक आढावा**
प्रा. दिनेश जगन्नाथ नहिरे / ५९१
८४. **अण्णा भाऊ साठे यांच्या निवडक साहित्यातील स्त्री चित्रण**
डॉ. सोनाली संतोष कदम / ५९६
८५. **अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील भाषिक वैशिष्ट्ये– एक अभ्यास**
डॉ. रविराज अच्युत फुरडे / ६०१
८६. **अण्णा भाऊ साठे यांचा आर्थिक दृष्टिकोन**
प्रा. युवराज धनाजी खडके / ६०९
८७. **अण्णा भाऊंच्या वैजयंता कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा**
प्रा. मल्हारी पवार / ६१२
८८. **अण्णा भाऊ साठे आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ**
डॉ. केशव अंबादास लहाने / ६२६
८९. **अण्णा भाऊ साठे यांचे कामगार चळवळीतील योगदान**
सौ. स्नेहल सुरेश बेलवलकर / ६३२
९०. **साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे : एक दीपस्तंभ**
प्रा. डॉ. मधुकर नवगिरे / ६४१
९१. **अण्णा भाऊंच्या साहित्यातील पर्यावरण चित्रण**
डॉ. पी. डी. गाथाडे / ६४७
९२. **अण्णा भाऊ साठे यांच्या 'आवडी' या कादंबरीतील नायिका**
प्रा. सीमा हडकर / ६५३
९३. **अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य लेखनाच्या प्रेरणा**
बेटकर वैशाली चनबस / ६५८
९४. **अण्णा भाऊ साठे यांची शाहिरी : एक ऐतिहासिक अवलोकन**
प्रा. सुमन लक्ष्मणराव केंद्रे / ६६४

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

## संदर्भ

१) मेश्राम योगेन्द्र, दलित साहित्य : उद्गम आणि विकास', श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर, १९९८.

२) डांगळे अर्जुन, 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे : निवडक वाङ्मय', महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९८.

३) साठे अण्णा भाऊ, 'आवडी', गुलाबराव मारुती कारले प्रकाशक, सुरेश एजन्सी, पुणे, २०१०.

४) रेगे शर्मिला व सोनाळकर वंदना, 'पितृसत्ता आणि स्त्रीमुक्ती', क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, धुळे, २००७.

५) संपा : आहिरे गंगाधर, 'समता संगराची पन्नास वर्षे', सम्यक प्रबोधन सभा, नाशिक, २००६.

६) डॉ. आंबेडकर बी. आर., अनुवादक : पगारे तुलसी, 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती', सुगत प्रकाशन, नागपूर, १९८५.

❑❑❑

Principal
Jawahar Arts, S... Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad



# क्रांतिकारी लेखक अण्णा भाऊ साठे

**प्रा. सत्येंद्र राऊत**
जवाहर महाविद्यालय, अणदूर

अण्णा भाऊ साठे म्हणजे मराठी साहित्य विश्वातील एक अद्वितीय चमत्कार समजला जातो. प्रतिभासंपन्न शाहीर, हाडांचे कथालेखक आणि ख्यातनाम कादंबरीकार म्हणून अण्णा भाऊ साठे यांचा वाचकांच्या मनःपटलावर अमीट ठसा उमटलेला आहे. प्रतिभा, कल्पना आणि सत्याचा सौंदर्यपूर्ण आविष्कार अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यकृतींमधून झाला आहे. अण्णा भाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, आठ पटकथा, तीन नाटके, एक प्रवासवर्णन, तेरा कथासंग्रह, १४ लोकनाट्य, १० प्रसिद्ध पोवाडे व १२ उपहासात्मक लेख लिहिले आहेत. प्रतिभा, कल्पना आणि सत्याचा सौंदर्य पूर्ण आविष्कार अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यकृतींमधून झालेला दिसून येत आहे. सर्वसामान्य माणसाला भावणारं, त्याच्याच जीवनाचं प्रतिबिंब त्याला साहित्यात दाखवून देणारं प्रत्ययकारी व क्रांतिकारी लेखन अण्णा भाऊंनी केलं आहे. त्यांची पात्रे बंडखोर आणि शूर आहेत. त्यांच्यात अन्यायाविरुद्ध झुंज घेण्याची आणि प्राण पणाला लावण्याची हिंमत आहे.

बंगालचा दुष्काळ, तेलंगण संग्राम, पंजाब–दिल्लीचा पोवाडा, अमळनेरचे हुतात्मे, काळ्याबाजाराचा पोवाडा, माझी मैना, हिटलरचा फॅसिझम विरोधात स्टॅलिनग्राडचा पोवाडा, बर्लिनचा पोवाडा, अशी अनेक गाणी व पोवाडे अण्णा

भाऊ साठे यांनी रचले आहेत. त्यांनी आपल्या गाण्यातून व पोवाड्यातून अनेक सामाजिक राजकीय प्रश्नांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय समस्यांना वाचा फोडण्याचे महान कार्य केले आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीसह संयुक्त महाराष्ट्र चळवळीत तसेच गोवा मुक्ती संग्रामाच्या वेळीही त्यांनी जनजागृतीचे प्रचंड काम केले.

अण्णा भाऊ साठे एक कलाकार म्हणून तसेच एक सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणूनही ते प्रत्येक उपक्रमात आंदोलनात सहभागी होत असत. चलेजाव चळवळीच्या काळात वाटेगावातही बर्डे गुरुजींच्या नेतृत्वाखाली अनेक घडामोडी सुरु होत्या. अण्णा भाऊ त्यात सामील असल्याने त्यांच्यावर वॉरंट निघाले परिणामी त्यांनी कायमचे घर सोडले. पुढे त्यांना तत्त्वज्ञानाची, विचारांची एक दिशा मिळत गेली आणि त्यांनी कम्युनिस्ट पक्षाचे पूर्णवेळ काम करायला सुरुवात केली. आपला पूर्ण वेळ पक्षकार्यासाठी झोकून दिले. या वेळी शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर हे देखील त्यांच्या समवेत होतेच या माध्यमातूनच त्यांच्या लिखाणाला सुरुवात झाली. लावण्या, पोवाडे, पथनाट्ये म्हणजे त्यांच्या ललित साहित्याची पूर्वतयारी होती. त्यांनी एकूण सुमारे १५ वगनाट्य लिहिली व त्यामुळेच त्यांना प्रसिद्धी मिळत गेली.

१९४५ च्या दरम्यान मुंबईत अण्णांच्या आयुष्याला काही स्थिरता लाभली. लोकयुद्ध' साप्ताहिकात वार्ताहराचे काम करीत असताना त्यांनी अकलेची गोष्ट, माझी मुंबई अशी गाजलेली लोकनाट्ये लिहिली. या काळातच संत साहित्यासह अनेक प्रतिभावंतांच्या अभिजात कलाकृती त्यांनी वाचून काढल्या. वैचारिक आणि कलाविषयक वाचनाचे समृद्ध लेखक व्हायला त्यांना मदत झाली. अण्णा भाऊ क्रांतिकारी लेखक म्हणून यशाचे रहस्य म्हणजे त्यांनी नेहमी सामान्य वाचकाच्या मनाची व्यथा आपल्या लेखणातून मांडली. सामान्य वाचकालाच प्रमाण मानल्याने वस्तुनिष्ठ असलेले त्यांचे साहित्य वाचकांच्या गळ्यातील ताईत बनले. इ. वी. सन् १९५० ते १९६२ हा त्यांच्या या साहित्यक्षेत्रातील सुवर्णकाळ होता. याच काळात त्यांच्या पुस्तकांच्या अनेक आवृत्ती निघाल्या. या काळातच ते प्रचंड यशस्वी होत असताना त्यांचे स्वतःचे वैयक्तिक जीवन मात्र धकाधकीचे झाले होते. या सुवर्णकाळातच त्यांनी वैजयंता, माकडीचा माळ, चिखलातील कमळ, वारणेचा वाघ, फकिरा अशा अनेक कादंबऱ्या लिहिल्या व तीनशेच्या वर कथा लिहिल्या खुळंवाडी, बरबाद्या कंजारी, कृष्णाकाठच्या कथा असे त्यांचे कथासंग्रहही प्रसिद्ध झाली आहेत. अण्णा भाऊ साठे यांचे कादंबरी लेखन विपुल



आहे. विषयाच्या नाविन्याने अवतरलेली त्यांची कादंबरीसृष्टी ग्रामीण जीवनाचे आणि दलित जीवनाचे चित्र साकारते. वारणेच्या खोऱ्यात अलगुज, आवडी, मथुरा, पाझर, रानगंगा, केवड्याचं कणीस, मंगल, वैर, कुरुप, अहंकार, रुपा यातून ग्रामीण जीवनाचं, तर चित्रा, फकिरा, आघात, डोळे मोडीत राधा चाले, रत्ना या कादंबऱ्यांमधून दलित जीवनाचे चित्रण केले आहे.

कादंबरी लेखनाचा वेग कमालीचा असल्याने अण्णा भाऊ साठे समाजातील दलित माणसांची दुःख, त्यांच्या पोटासाठीचा संघर्ष लेखणीतून व पोवाडाच्या माध्यमातून चित्रित करतात. त्यांच्या सर्वात गाजलेल्या फकिराचे यश मात्र अन्य कादंबऱ्यांना मिळाले नाही ही खंत अनेक समीक्षकांनी व्यक्त केली आहे. मात्र ते लोकप्रिय लेखक ठरले हे सत्य आहे. मराठीतील ग्रामीण प्रादेशिक दलित साहित्यावर अण्णा भाऊंचे प्रभुत्व होते. अण्णा भाऊंच्या साहित्याचे हिंदी, गुजराती, उडिया, बंगाली, तमिळ, मल्याळी या भारतीय भाषांबरोबरच रशियन, पोलिश, इंग्रजी, फ्रेंच अशा जगातील २७ भाषांमध्ये भाषांतर झालेले आहे. लेखणीचे हत्यार बनवून त्यांनी पुरोगामी, विज्ञाननिष्ठ, स्त्रीवादी लढाऊ, इत्यादी आविष्काराचा दीपस्तंभ मराठी साहित्याच्या क्षेत्रात उभा केला. एवढ्या मोठ्या कर्तृत्वामुळे त्यांना प्रसिद्धी मिळालेली होती. अण्णांच्या बारा कथांवर चित्रपट निघाले आहेत.

अण्णा भाऊं सारखे लेखक प्रारंभी कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रातून वार्ताहर, कथाकार, गीतकार म्हणून लेखन करू लागले. कम्युनिस्ट पक्षाच्या व विचारांशी संबंधित स. ह. मोडकांच्या लोकसाहित्य प्रकाशनाने व वा. वी. भटांच्या अभिनव प्रकाशनाने प्रथम अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या, कथा संग्रह, नवे तमाशे, नाट्य संग्रह प्रकाशित करून जनमानसात नेण्याची भरीव काम केली आहेत. अण्णा भाऊ साठे यांच्या आदर्श जगण्याचे तत्त्वज्ञान आणि लढण्याची भूमी निश्चित होती. आपला जीवनविषयक दृष्टिकोण कथा, कादंबरी, नाटक, कामगार गीते लोकनाट्य आणि कामगार चळवळीतून स्पष्टपणे त्यांनी मांडला आहे. आयुष्यभर कुठेच आणि कोणाशीही, कोणत्याही पातळीवर तडजोड त्यांनी केली नाही. अण्णा भाऊंनी जे पाहिले ते लिहिले. प्रचंड निष्ठा असलेले साहित्याच्या विविध प्रकारांतून आपले विचार मांडले. भटक्या, विमुक्तांना, दलित कामगारांना, अठरापगड जातीत पिचत पडलेल्या माणसाला अण्णा भाऊंनी नायक केले. त्यांनी उद्याच्या समर्थ भारताचे सुंदर स्वप्न रेखाटले म्हणून आजही



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

त्यांच्या साहित्यातून माणसाला जगण्याचे आणि जगविण्याचे बळ मिळते. पुरुषांचे शौर्य, स्त्रीचे सौंदर्य आणि शील अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यातून मांडले. शोषणाविरुद्ध एल्गार पुकारणाऱ्या फकिरा सारखे बंडखोर नायक मराठी साहित्याला साता समुद्रापार नेले. अण्णा भाऊंचे हे थोर उपकार मराठी माणूस कधीच विसरु शकणार नाही.

अण्णा भाऊ साठे यांनी आयुष्याच्या पूर्वार्धात त्यांनी कामगार चळवळीत संप, मोर्चे, सभा, आंदोलने केली परंतु उत्तरार्धात त्यांनी लेखणीला वाहून घेतले होते. कारण लेखणीच्या माध्यमातून समाज परिवर्तन होऊ शकते. असा त्यांचा दृढ विश्वास होता. फुले आंबेडकरांची लेखन चळवळ त्यांनी निष्ठेने अखेरच्या श्वासापर्यंत चालवली. अण्णा भाऊ साठे यांनी आपला परिसर, आपली संस्कृती जगण्यासाठी प्रेरक असणारे तत्त्वज्ञान, आपले संस्कार, प्रेरक असणारी भाषा, आपल्या समाज व्यवस्थेचे अंतरंग आणि स्वतःला जगून इतरांना जगण्याची प्रेरणा देणारी माणसं साहित्यातून अजरामर केली आहेत. माणसांसाठी सतत चिंतन करणारा आणि माणसांमध्ये लढण्याचे बळ निर्माण करणारा लढवय्या साहित्यिक म्हणून अण्णा भाऊ साठे यांची सर्वदूर ख्याती आहे. आज अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांची भारतीयांना खूप आवश्यकता आहे. म्हणून त्यांचे प्रेरणादायक विचार सर्वांनीच आत्मसात करणे आवश्यक वाटते.

❑❑❑

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad



# अण्णा भाऊ साठे व त्यांच्या साहित्यातील स्त्री दर्शन

**डॉ. प्रगती दिनेश नरखेडकर**
सुशिलाबाई रामचंद्रराव मामीडवार समाजकार्य महाविद्यालय, चंद्रपूर

**प्रस्तावना**

अण्णा भाऊंच्या साहित्यातील माणसांचा जीवन संघर्ष त्यांची जीवनाकडे बघण्याची दृष्टी या सर्व विचारांमधून सातत्याने एक जाणवते ते म्हणजे ही साहित्यसंपदा नसून हा समाजमनात पोहोचविणारा हुंकार होय. कारण यातूनच पुढे समाज परिवर्तनाच्या दिशांना गती मिळालेली दिसून येते. अण्णा भाऊंचा विविध साहित्यातून, विविध विचाराच्या, प्रवृत्ती प्रकृतीची माणसं रेखाटलेली आहे. ही माणसं जगण्यासाठी झगडणारी आहेत. या माणसांच्या जगण्यावर तात्कालीन व्यवस्थेने, निसर्गाने व परिस्थितीनेही फार मोठा बदल घडविलेला आहे. अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यातून व्यक्तिरेखा, त्यांचे जीवन संघर्ष, सामाजिक परिस्थिती, रीतीभाती, श्रद्धा अंधश्रद्धा व स्त्रीविषयक दृष्टिकोन या साऱ्याची सखोल चिकित्सा करून विचारांची नव्याने मांडणी केल्याचे दिसून येते, म्हणूनच त्याला चळवळ म्हणताना निसंकोचही संदेह वाटत नाही. स्वातंत्र्योत्तर भारतातील विविध चळवळींना आपण ओळखतो. परंतु अण्णा भाऊंची संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही आधुनिक